महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

**१४ एप्रिल विशेषांक...**

दैनिक आवाज च्या सर्व प्रतिनिधी, वाचक, हितचिंतक, जाहिरातदार आपणास आवाहन करण्यात येते की, दि. १४ एप्रिल रोजी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होत आहे. या निमित्त महामानवास अभिवादन म्हणून जयंती विशेष अंक (ई-पेपर, पीडिएफ, फोटोकॉपी) प्रकाशित करण्यात येणार आहे. तरी आपण सर्वांनी या विशेषांकात सहभाग म्हणून शुभेच्छा जाहिरात तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विशेष लेख दि. १२ एप्रिल पर्यंत देण्याचे करावे ही विनंती.

संपर्क -

* संपादक - भगवान सोनवणे ९५४५९१०७७

* सह संपादक - भाऊसाहेब हुजबंद ८९९९२१९९४

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - ११ वे ■ अंक क्र. - २३६ ■ बुधवार दि. ९ एप्रिल २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

# एक फोन कॉल आला..बँक डिटेल दिले आणि लाखो रुपये गमावून बसले

## नांदगाव येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापकांना २४ लाखांचा ऑनलाईन गंडा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**मारुती जगधने, नांदगाव –**

सायबर क्राईम सातत्याने होत आहे ऑनलाइन व्यवहार झाल्यामुळे भामटे नागरिकांना लुबाडत असल्याच्या अनेक घटना घटना उघडकीस येत आहेत. त्या घटनांची पोलिसात नोंद देखील आहे याबाबत संरक्षण विभागाने ग्रह खात्याने असे कोणी कॉल तुम्हाला करत असेल आणि तुमच्याकडे पैशाची मागणी करत असेल तर तो सायबर क्राईम आहे याबाबत तात्काळ पोलिसांना संपर्क करावा असे जागृत करणारे दैनंदिन फोन प्रत्येकाच्या कानावर पडत असतानाही नांदगाव शहरात असाच एक प्रकार घडला आहे.

तुमच्या खात्यावर मनी लॉन्ड्रिंग ची रक्कम जमा झाल्याचा संशय असून, एक मनी लॉन्ड्रींगच्या केस मध्ये तुमचे एटीएम कार्ड सापडले आहे. त्या एटीएम कार्डच्या खात्यावर ६८ लाख रुपये जमा आहे. हे ६८ लाख रुपये तुमच्या खात्यावर कसे जमा झाली आहे. याची चौकशी करायची आहे असा बनाव करून नांदगाव येथील एका सेवानिवृत्त मुख्याध्यापकास २४ लाख १० हजार रुपयाचा ऑनलाइन गंडा घालण्याचा प्रकार घडला आहे. आपली फसवणूक झाली असल्याचे सेवानिवृत्त मुख्याध्यापकास लक्षात येताच मुख्याध्यापकांनी नांदगाव पोलीस स्टेशन गाठत झालेल्या प्रकाराबद्दल तक्रार दिली असून शिक्षकांच्या तक्रारीवरून नांदगाव पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सविस्तर वृत्त असे की नांदगाव येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक बापू धनाजी बोरसे हे आपल्या कुटुंबासमवेत नांदगाव येथे स्थायिक आहे. २४ फेब्रुवारी त्यांना एक कॉल आला. समोरची व्यक्ती हिंदी बोलत होती. या फोन कॉल द्वारे मुख्याध्यापक यांना सांगण्यात आले की, आम्ही नरेश गोयल यांच्या फ्रॉड केस मध्ये धाड टाकली असून त्या मध्ये तुमचे कॅनरा बँकेचे एटीएम सापडले असून त्यावरती ६८ लाख जमा आहेत तर ते ६८लाख रुपये तुमच्या खात्यामध्ये कशी आली आणि ही रक्कम कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे याचे आम्हाला चौकशी करायची आहे.

यावेळी मुख्याध्यापकांनी त्यांना सांगितले की सदर रक्कम सेवानिवृत्तीची ग्रॅज्युएटी, पेन्शन, विक्री भविष्य निर्वाह निधी याची असून यातील काही रक्कम मी माझ्या वैयक्तिक आणि कुटुंबाच्या कामासाठी खरचली देखील आहे. आणि मी आयकर देखील भरतो. मुख्याध्यापक यांनी असे सांगताच आम्हाला फक्त चौकशी करायची असून मी तुम्हाला व्हाट्सअप वरती हाय पाठवतो तुम्ही तुमच्या बँकेची स्टेटमेंट त्यावरती पाठवा मुख्याध्यापकांनी त्यांचे बँकेचे स्टेटमेंट त्यांना पाठवले असता. परत काही तासांनी मुख्याध्यापक यांना व्हाट्सअप वरून व्हिडिओ कॉल आला.

या व्हिडिओकॉन मध्ये मुख्याध्यापकांना कुलाबा नाव असलेले पोलीस स्टेशन दाखवण्यात आले. पोलीस अधिकारी व्यक्ती युनिफॉर्म मध्ये दाखवण्यात आली. मुख्याध्यापक यांना या व्हिडिओ कॉल दरम्यान सांगण्यात आले की तुमच्या स्टेटमेंट पासबुकची चौकशी केली असून तुमच्या खात्यावर असलेली रक्कम त्याची आम्हाला चौकशी करायची आहे. तरी तुमच्या खात्यावरील रक्कम तुम्ही आरटीजीएस द्वारे आम्हाला पाठवा आम्ही त्याची चौकशी करून तुम्हाला ती परत करू आणि ही माहिती गोपनीय असून याबद्दल तुमच्या घरच्यांना आणि कोणालाही सांगू नका. मुख्याध्यापक यांनी रक्कम आरटीजीएसद्वारे पाठवण्याचा नाकार दिला असता. त्यांना अटक करण्याची धमकी देण्यात आली.

मुख्याध्यापक यांना आरबीआय च्या नावाने एक इंग्रजी भाषेतील पीडीएफ नोटीस पाठवण्यात आली. त्यावरती बराच दस्तऐवज लिहिलेला होता आणि मुख्याध्यापक यांना सांगण्यात आले यावरती आरबीआयचा खाते क्रमांक असून त्यावरती लिहिलेली रक्कम आरटीजीएस करा नाहीतर तुम्हाला अटक करण्यात येईल असा दम देण्यात आला.

अटक होण्याच्या भीतीपोटी मोबाईल धारकाने सांगितलेल्या खात्यावर मुख्याध्यापक यांनी क्रमाक्रमाने २४ लाख १० हजार इतकी रक्कम विविध खात्यांवरती पाठवली.

आता चौकशी पूर्ण झाली असेल तर माझी रक्कम आता परत करा अशी मागणी मुख्याध्यापक यांनी सुरू केले असता रक्कम परत न करता अजून रकमेची मागणी करण्यात येऊ लागल्याने आपली फसवणूक झाल्याचे मुख्याध्यापक बोरसे यांच्या लक्षात आले. आणि त्यांनी तात्काळ सायबर विभागाला तक्रार केली असता संबंधित घटनेबद्दल मुख्याध्यापकाकडून नांदगाव पोलीस स्टेशन मध्ये देखील तक्रार देण्यात आली.

**सदर घटनेचा आम्ही गुन्हा दाखल केला असून, तपास सुरू केला आहे. ऑनलाइन फ्रॉडला बळी पडू नका असा काही प्रकार घडल्यास त्वरित आमच्याशी संपर्क साधा. कोणतीही माहिती लपवून ठेवू नका. प्रीतम चौधरी (पोलीस निरीक्षक, नांदगाव पोलीस स्टेशन)**

## इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाड एक्झाम मधील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तांदूळवाडी – श्री सिद्ध बाबा धर्मनाथ जी महाराज सेवाभावी संस्था संचलित एम.डी.काळे इंग्लिश मीडियम पब्लिक स्कूल ,तांदुळवाडी दि. ७ एप्रिल २०२५ सोमवार रोजी एम.डी .काळे पब्लिक स्कूल, तांदुळवाडी स्कूल मध्ये इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाड एक्झाम मधील यशस्वी विद्यार्थ्यांनचा बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या उपस्थित एम.डी .काळे चे संस्थापक दिनेश काळे सर व प्राचार्य



श्रीमती .नेहा काळे मॅडम , उपप्राचार्य साक्षी अहिरे मॅडम ,सर्व शिक्षक यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांना चेअरमन दिनेश काळे सर यांनी मेडल व प्रमाणपत्र वाटप करून सन्मान करण्यात आला या परीक्षेमध्ये पहिली ते सहावीतील ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता तर ३६ विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल, व प्रमाणपत्र तसेच बाकी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. शाळेचे संस्थापक चेअरमन श्री .दिनेश काळे सर व प्राचार्य श्रीमती .नेहा काळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांसाठी खूप मोठे व्यासपीठ निर्माण करून दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर सुरसे सर यांनी केले.

## खा. शोभा बच्छाव यांनी केली नुकसानग्रस्त भागाची पाहणी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ, सटाणा प्रतिनिधी : बागलाण तालुक्यात झालेल्या अवकाळी, वादळी वारा व पावसामुळे शेतातील पिकांचे अतोनात नुकसान झाले असून शेतकऱ्यांना आसमानी व सुलतानी संकटांना तोंड द्यावे लागत आहे. ३ व ४ एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे पाहणी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या पहाणीनंतर दुसऱ्या दिवशी खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली.

तालुक्यातील बिजोटे, आखतवाडे परिसरात अवकाळी पावसाने थैमान घातले होते यात काढणीला आलेल्या पीकांचे अतोनात नुकसान झाले. याबाबत बागलाणचे तहसीलदार कैलास चावडे यांनी तलाठी यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामाचे आदेश दिले होते. या भागात माजी केंद्रीय मंत्री शरदचंद्र पवार, राज्याचे माजी कृषिमंत्री सदाभाऊ खोत, माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच केंद्राच्या पथकाने ने या भागात पाहणी दौरा केला आहे. दरम्यान गुरुवार (ता.३) रोजी बिजोटे, आखतवाडे, जायखेडा या भागात मेघगर्जनेसह वादळी वारा व जोरदार पाऊस झाल्याने काढणीला आलेला कांदा व शेतकऱ्यांनी शेतात काढून ठेवलेला कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तसेच डाळिंब पिकाचे हे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावल्याची खंत शेतकऱ्यांकडून केली जात आहे. पावसात भिजलेला कांदा विक्रीही करता येणार नाही आणि चाळीत साठवूनही ठेवता येणार नाही असे शेतकऱ्यांकडून बोलले जात आहे. कांदा लागवडीसाठी केलेला खर्चही निघणार नसल्याने शेतकरी रडकुंडीला आलेले आहेत. याच भागात डाळिंब पिकाचेही नुकसान झाल्याने काढणीला आलेले डाळिंब बागेचेही नुकसान झाले आहे. दरम्यान राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी रविवार (ता.६) रोजी बिजोटे येथील शेतकऱ्यांची भेट घेतली व येत्या ७ ते ८ दिवसात नुकसान भरपाई मिळेल असे आश्वासित शेतकऱ्यांना केले आहे. या भागात अनेक मंत्री आले आणि आश्वासन देऊन केले मात्र अनेक शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित राहिल्याची व्यथा येथील शेतकऱ्यांनी राज्याचे कृषी मंत्री श्री. कोकाटे यांना बोलून दाखवली. सोमवार (ता.७) खासदार डॉक्टर शोभा ते बच्छाव यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली व शेतकऱ्यांना धीर दिला. यावेळी प्रांताधिकारी कल्पना ठुबे, तहसीलदार कैलास चावडे, किशोर कदम, कृषी अधिकारी श्री. महाले, मंडळ अधिकारी व तलाठी उपस्थित होते.

### नासिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स अँड नॉन टीचिंग एम्पलॉई को-ऑपरेटिव्ह सोसायटी तर्फे

## गुणवंत शिक्षक व विद्यार्थी पुरस्कार वितरण सोहळा

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव –**

नासिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स अँड नॉन टीचिंग एम्पलॉई को-ऑपरेटिव्ह सोसायटी नाशिक या सोसायटीचा गुणवंत विद्यार्थी व गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा सोसायटीचे चेअरमन शांताराम देवरे,सर्व संचालक मंडळ,मा. खासदार भास्कर भगरे सर यांच्या उपस्थित पार पडला. कार्यक्रम प्रसंगी ८५ पुरस्कार वितरण करण्यात आले.



यावेळी माध्यमिक विद्यालय वाकी बुद्रुक तालुका चांदवड या विद्यालयाचे मुख्याध्यापक एस एम मापारी यांना नाशिक डिस्ट्रिक्ट सेकंडरी टीचर्स अँड नॉन टीचिंग एम्पलॉई को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नाशिकच्या वतीने मा. खासदार भास्कर भगरे सर यांच्या हस्ते आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांना स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा, महावस्त्र व प्रमाणपत्र सन्मानपुर्वक देण्यात आले. पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी मा. प्राथमिक शिक्षणाधिकारी नितीनजी बच्छावसाहेब, उपसंचालक भाऊसाहेब चव्हाणसाहेब, म्हाडाचे अध्यक्ष रंजन ठाकरे, सोसायटीचे चेअरमन शांताराम देवरे व्हायचेअरमन भारतीताई पाटील, कार्यवाह निंबा कापडणीस, चांदवड तालुका संचालक ज्ञानेश्वर ठाकरे, सर्व संचालक मंडळ, शिक्षक नेते शिवाजीराव निरगुडे, बाळासाहेब सूर्यवंशी, नानासाहेब देवरे जिभाऊ शिंदे,संजय देवरे, किशोर जाधव तसेच माध्यमिक विद्यालय वाकी बुद्रुकचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मित्रपरिवार, सोसायटीचे सभासद व नातेवाईक उपस्थित होते.

आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल एस एम मापारी यांना पुण्यश्लोक देवी अहिल्या ग्राम विकास संस्थेचे संस्थापक शिरीषकुमार कोतवाल,मा. मीनाताई कोतवाल,अध्यक्ष राहुल कोतवाल,सचिव दत्तात्रय बारगळ, लासलगाव ग्रामपंचायत सदस्य दत्ता पाटील, छत्रपती शिवाजी विद्या प्रसारक मंडळ दिघवद चे अध्यक्ष बाळासाहेब रसाळ, साहेबराव गांगुर्डे, दत्तू गांगुर्डे, नानासाहेब गांगुर्डे, विठ्ठलराव गांगुर्डे अँड. भाऊराव गांगुर्डे, अण्णासाहेब गांगुर्डे, मुख्याध्यापक पेंढारी सर, गुरुवर्य सुरेश सोनवणे, आदर्श शिक्षक सदाशिव गांगुर्डे, शालेय समिती चे अध्यक्ष मच्छिंद्र कोकणे, डॉ ईश्वर वाकचौरे, गोरख कोकणे, सोपान काका कोकणे (जि.प.शालेय समिती अध्यक्ष), नवनाथ काळे, रमेश पवार, बळवंत शिंदे, प्रतिभा पाटील, दीपक शिंदे, गोपीचंद वाघ सर्व शिक्षक गुरुजन दिघवद व वाकी बु यांनी शुभेच्छा दिल्या.

## राजयोगिनी डॉ. रतन मोहिनी दादीजी यांचा वयाच्या १०१ व्या वर्षी देहत्याग

नाशिक: प्रतिनिधी - आज, ८ एप्रिल २०२५ रोजी, ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या मुख्य प्रशासिका राजयोगिनी डॉ. रतन मोहिनी दादीजी यांनी वयाच्या १०१ व्या वर्षी देहत्याग केला. त्यांचं संपूर्ण आयुष्य हे ईश्वर सेवा, आत्मशुद्धी आणि मानवतेसाठी झटण्यात गेलं.

दादीजींचं जीवन:- डॉ. रतन मोहिनी दादीजी यांचा जन्म १९२४ मध्ये झाला. लहान वयातच त्या ब्रह्माकुमारीज् संस्थेशी जोडल्या गेल्या. त्यांनी आयुष्यभर विश्व सेवेसाठी स्वतःला समर्पित केलं. साधेपणा, प्रेम, नम्रता आणि राजयोगच्या अभ्यासाने त्यांनी अनेकांना आत्मज्ञानाची वाट दाखवली.

त्यांनी भारतासह अनेक देशांमध्ये प्रवास करून ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या सेवांचा विस्तार केला. लाखो लोकांना त्यांनी राजयोग शिकवला आणि त्यांच्या जीवनात शांतता, सकारात्मकता आणली.

नेतृत्व आणि सेवा:- दादीजींनी २०२१ पासून ब्रह्माकुमारीज् संस्थेच्या मुख्य प्रशासिकेची जबाबदारी स्वीकारली. वयाची १०० वर्षे ओलांडूनही त्या पूर्ण ताकदीने सेवेत सक्रिय होत्या. त्यांचा आवाज शांत होता, पण शब्द प्रभावी होते. त्या एक प्रेमळ आईसारख्या सर्वांना मार्गदर्शन करत.

भावपूर्ण श्रद्धांजली:- आज जरी त्या आपल्या मध्ये नसल्या, तरी त्यांचं विचारधन, शिकवण आणि आत्मिक प्रेम आपल्या हृदयात सदैव जिवंत राहील. त्यांनी दाखवलेली सत्याची, शांतीची आणि प्रेमाची वाट हीच खरी श्रद्धांजली ठरेल.दादीजी, आपलं पवित्र जीवन आणि आध्यात्मिक मार्गदर्शन आम्हाला नेहमी प्रेरणा देत राहील. आपल्या चरणी कोटी कोटी प्रणाम।नाशिक जिल्हा ब्रह्माकुमारीज परिवाराच्यावतीने भावपूर्ण आदरांजली!

ॐ शांती।

राजयोगिनी ब्रम्हाकुमारी वासंती दीदी,
जिल्हा मुख्य संचालिका,
प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, नाशिक जिल्हा



ब्रह्माकुमारी रतनमोहिनी दादी

## राज्यातील धर्मदाय रूग्णालयावर सरकारने करडी नजर ठेवून; गरीब व सर्वसामान्यांसाठी योग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात

**दै. आवाज वृत्तसेवा...**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने पैशाअभावी उपचार नाकारल्याने तनिषा भिसे या गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केला होता.त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे.पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेत उपचार न मिळाल्याने प्रसूतीदरम्यान महिलेचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी धर्मदाय सह आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिले आहेत.पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणावरून पुण्यात रूग्णालयाच्या बाहेर विविध संघटनांकडुन आंदोलन करण्यात आले होते.असे सांगितले जाते की १० लाख रुपये जमा न केल्यामुळे महिलेला रूग्णालयात भर्ती करण्यास रूग्णालय प्रशासनाने मनाई केल्याचे सांगितले जाते.यानंतर त्या महिलेने दोन जुळव्या मुलांना जन्म दिला व तीचा यात मृत्यू झाला.यावर राज्य शासनाने ताबडतोब घटनेची गांभीर्याने दखल घेतली व या प्रकरणातची चौकशी करण्यासाठी पाच जणांची समिती गठीत करण्यात आली आहे.यानंतर आता रूग्णालयाकडून एक पत्रक जारी करण्यात आले असून यानंतर रूग्णांकडून डिपॉझिट घेतले जाणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात अनेक प्रकारचे उपचार रूग्णांवर होतात.त्यामुळे सर्व चूक रूग्णालयाची आहे असे म्हणून चालणार नाही.परंतु या केसमध्ये नक्कीच असंवेदनशीलपणा दाखविण्यात आला आहे ही बाब तेथील झालेल्या घटनेवरून स्पष्ट दिसून येते. कारण गर्भवती महिलेचा मृत्यू अंगावर शहारे येणारा आहे. त्यामुळेच तेथील नागरिक किंवा आप्त आक्रमक झालेत. कोणतेही रूग्णालयात असो रूग्णालयात येणारा प्रत्येक व्यक्ती आपल्या वेदना घेऊन येत असतो.कारण कोणत्याही रूग्णांची आपात्कालीन प्रकृती खराब झाली तर आपल्या परिस्थितीनुसार खाजगी किंवा सरकारी किंवा धर्मदाय रूग्णालयाकडे धाव घेऊन रूग्णांवर आपात्कालीन परिस्थितीत ताबडतोब उपचार व्हावेत अशी इच्छा संपूर्ण रूग्णांच्या नातेवाइकांची असते.अशा परिस्थितीत रूग्णांचे परिवार आपल्या ऐपतीप्रमाणे पैसा गोळा करून त्या-त्या रूग्णालयात उपचार घेतात.परंतु आपण जेव्हा धर्मदाय रूग्णालयाची परिभाषा करतो तेव्हा आपात्कालीन परिस्थितीत कोणताही रूग्ण असो त्यावर रूग्णालय प्रशासनाने ताबडतोब उपचार करायला हवेत.कारण हा जिवन मरणाचा प्रश्न असतो.कारण यात थोडीशी चूक किंवा वेळ झाला तर तो रूग्ण दगावतो आणि हाच प्रकार दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात झाला. आपण डॉक्टरांना दैवी शक्ती असल्याचे मानतो त्याचपध्दतीने रूग्णालय प्रशासनाने तत्परता दाखविने गरजेचे असते. रूग्णालयाला सुध्दा अनेक अडचणींचा सामना करावा लागतो यात दुमत नाही. कारण स्टाफ कमी असने अशाप्रकारे अनेक अडचणी त्यांच्या समोर सुध्दा असु शकतात यालाही नाकारता येत नाही. परंतु दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या अशा घटनांमुळे राज्यात एक वेगळाच संदेश जातो.कारण राज्यात तब्बल ४७६ धर्मदाय रूग्णालये (ट्रस्ट हॉस्पिटल) आ-हेत. त्यामुळे आता आरोग्य विभाग व सरकारची जबाबदारी आहे की या संपूर्ण रूग्णालयाची काय अवस्था आहे किंवा रूग्णालय प्रशासनाच्या काय-अडचणी आहेत किंवा या रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांवर योग्य उपचार होतो की नाही किंवा हयगय तर होत नाही ना!या संपूर्ण गोष्टींवर आता सरकारने करडी नजर ठेवण्याची गरज आहे.या संदर्भात माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सर्वांना आश्वस्त केले की भविष्यात असे प्रकार घडू नयेत, यासाठी एक निश्चित कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे काम सुरू आहे.याचे मी मनापासून स्वागत करतो.कारण पुढे अशा घटना होणार नाही याची ताबडतोब दखल मुख्यमंत्री महोदयांनी घेतली.पुण्यातील घटना पहाता राज्यातील संपूर्ण सरकारी रूग्णालयाने, निमसरकारी रूग्णालयाने, धर्मदाय रूग्णालयेसह खाजगी रुग्णालयांनी आपात्कालीन परिस्थितीत रूग्णांना सर्वो तोपरी मदत केली पाहिजे.कारण सध्याच्या परिस्थितीत खाजगी रुग्णालये मोठ्या प्रमाणात पैसा वसूल करतात यावर सुध्दा सरकारने अंकुश लावने गरजेचे आहे. कारण शेवटी माणूस हा माणूस असतो त्यामुळे धर्मदाय रूग्णालयांसोबतच खा-जगी रुग्णालयांनी सुध्दा माणुसकी या नात्याने गरीब-निर्धन व सर्वसामान्यांना सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून दिले तर ही खरी मानव सेवा समजली जाईल.कारण महागाईच्या काळात गरीब व सर्वसामान्यांना सर्वच बाबतीत मोठी कडवी झुंज द्यावी लागते या संपूर्ण परिस्थितीचा विचार करून संपूर्ण रूग्णालयांनी माफक दरात उपचार करण्यास स्वतःहुन तत्परता दाखवली तर अनेकांना जिवदान मिळेल व डॉक्टरांची दैवी शक्ती दिसून येईल.



**रमेश लांजेवार**
(प्रदेश प्रवक्ता)
(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

## वक्फ बिल मंजूर झाले त्याचे स्वागत; परंतु वक्फ बोर्ड पेक्षा कितीतरी पटीने संपत्ती आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांजवळ आहे त्याचे काय?

**दै. आवाज वृत्तसेवा...**

वक्फ बोर्ड दुरूस्ती विधेयक लोकसभेपाठोपाठ राज्यसभेतही विधेयकाला मंजुरी मिळाली आहे आणि आता राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहे याचे स्वागतच. असे सांगितले जाते की देशात रेल्वे जवळ ३३ लाख एकर जमीन आहे. त्याखालोखाल १७ लाख एकर जमीन संरक्षण विभागाची आहे व तिसऱ्या क्रमांकावर ४ लाख एकर जमीन वक्फ बोर्डची आहे म्हणजेच वक्फ बोर्डहे भारतातील सशस्त्र दल आणि भारतीय रेल्वे नंतर तिसरे सर्वात मोठे जमीनधारक आहेत. भारतात ३०वक्फ बोर्डअसल्याचे सांगितले जाते.एकूण मालमत्तेपैकी वक्फ बोर्डजवळ स्थिर मालमत्तांची संख्या ८.७२ लाख इतकी आहे तर जंगम मालमत्तांची संख्या १६ हजार इतकी आहे आणि या संपूर्ण मालमत्तेचे एकूण मूल्य १.२ लाख कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते.ही बाजू झाली वक्फ बोर्डाच्या संदर्भातील. दुसरीकडे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरात जळलेल्या नोटांचा आकडा १५ कोटींच्या जवळपास असल्याचे सांगण्यात आले होते. त्याच धर्तीवर न्यायपालिकेमध्ये पारदर्शकता असावी या उद्देशाने देशाच्या सरन्यायाधीशांसह सर्वोच्च न्यायालयाच्या ३० विद्यमान न्यायमूर्तींनी आपल्या संपत्तीची माहिती न्यायालयाच्या संकेतस्थळावर सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला आहे याचे मी मनापासून स्वागत करतो.त्याचप्रमाणे देशाच्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांनी सुध्दा देश हिताच्या दृष्टीकोनातून आपली संपत्ती सरकारच्या माध्यमातून सार्वजनिक करावी असे मला वाटते.परंतु देशात अल्पावधीत राजकीय पुढारी करोडपती होतात त्यांचे काय? आज देशात हजारोंच्या संख्येने आजी-माजी, आमदार-खासदार-मंत्री आहेत या सर्वांजवळ मोठ्या प्रमाणात चल-अचल संपत्ती आहे ही जर एकत्र केली तर हजारो कोटींची संपत्ती एका दिवसात सरकारच्या तिजोरीत येवू शकते यालाही नाकारता येत नाही.याकडेही सरकारने लक्ष देण्याची नितांत गरज आहे.हा अत्यंत महत्वाचा आणि गंभीर प्रश्न आहे. कारण आमदार-खासदार-नगरसेवक-जिल्हापरिषद सदस्य इत्यादींचा कालावधी हा फक्त पाच वर्षांचा असतो.नंतर पुन्हा निवडून आले तर पुन्हा त्या पदावर विराजमान होतात. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपण या राजकीय पुढाऱ्यांचा विचार केला तर हे संपूर्ण पुढारी पाच वर्षांत करोडपती होतात हि बाब आश्चर्यजनक नाही का?त्यामुळे गरीब, शेतकरी व सर्वसामान्यांनपुढे प्रश्न उपस्थित होतो की यांच्या जवळ नोटा छापण्याची मशिन आहे की काय असे वाटते!

आज आपण मंदिर प्रशासन, वक्फ बोर्ड, रेल्वे प्रशासन, पर्यटन स्थळे, सुर-क्षा विभाग किंवा अन्य विभाग यांच्या संपत्तीच्या तुलनेत विचार केला तर एवढी संपत्ती या संस्थांना जवळ नसेल तेवढी संपत्ती आज आपल्या देशातील ८० टक्के आजी-माजी, आमदार- खासदार-मंत्री-नगरसेवक-जिल्हा परिषद सदस्य इत्यादींची चल अचल संपत्ती एकत्र केली तर वफ्त बोर्ड किंवा अन्य विभागापेक्षाही कितीतरी पटीने जास्त संपत्ती असल्याचे आपणा सर्वांना दिसून येईल आणि ही संपत्ती एवढी आहे की देशाला १० वर्षे कोणाहीजवळुन कर्ज सुध्दा घेण्याची गरज भासणार नाही.आज देशात बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां ज्या दिसुन येतात त्याची मुख्य जड म्हणजे देशातील ८० टक्के आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांनी डांबुन ठेवलेल्या पैशांमुळे निर्माण झालेली ही अवस्था आहे. आज राजकीय पुढाऱ्यांचा पैसा चलनात रह-ला असता तर महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या किंवा मुलभूत समस्या या मुळातच उद्भवल्या नसत्या. देशाचे भविष्य उज्वल करायचे असेल तर देशातील आजी-माजी, आमदार-खासदार-मंत्री किंवा अन्य राजकीय पुढारी यांनी आपली वाजवीपेक्षा जास्त असले-ली संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करावी जेणेकरून देशाच्या उत्थानासाठी या पैशांचा सदुपयोग होईल.कारण राजकीय पुढाऱ्यांजवळ वाजवीपेक्षा जास्त असले-ली संपत्ती एकत्र केली व ती जर सरकारी तिजोरीत जमा केली तर देशाचे भविष्य उज्वल होवू शकते यालाही नाकारता येत नाही.मी महामहीम राष्ट्रपती,उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, सर्वोच्च न्यायालय यांना विनंती करतो की आपल्या मार्फत इतर संस्थांनांच्या संपत्तीची माहिती सरकार ठेवते याचे स्वागतच.परंतु सोबतच देशातील आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या संपूर्ण संपत्ती माहिती एकत्र करून वाजवीपेक्षा जास्त असलेली संपत्ती किंवा वाममार्गाने कमविलेली संपूर्ण संपत्ती सरकारी तिजोरीत आणने आज काळाची गरज आहे.

याकरीता सरकार अवश्य पुढाकार घेईल असे मला वाटते.जय हिंद!



**रमेश लांजेवार**
(प्रदेश प्रवक्ता)
(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

## पत्रकारांचे आयुष्य सुकर करण्यासाठी शासनाचे सातत्यपूर्ण काम - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई : पत्रकारांना बातम्या मिळविताना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो. पहिली बातमी आ-पली असावी, या स्पर्धेमुळे पत्रकारांची बातमी मिळविण्याची धडपड अनेकवेळा निदर्शनास येते. पत्रकार कुटुंबासाठी वेळ न देता आपल्या करिअरला वाहून घेत आपल्या कर्तव्याला न्याय देतात. पत्रकारांचे हे धडपडणारे आयुष्य सुकर करण्यासाठी शासन सातत्यपूर्ण काम करीत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

अण्णाभाऊ साठे सभागृहात टीव्ही जर्नलिस्ट असोसिएशनच्यावतीने आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कार्यक्रमास उद्योग मंत्री उदय सामंत, गृह राज्यमंत्री योगेश कदम, आमदार प्रसाद लाड, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, टिव्ही जर्नलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष उदय जाधव, महासचिव पंकज दळवी, खजिनदार प्रवीण पाटील उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायक्षेत्र) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

## ताहाराबाद विद्यालयातील योगेश सोनवणेची चीनमधील आशियाई स्पर्धांसाठी निवड






**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ, सटाणा प्रतिनिधी :- बागलाण तालुक्यातील ताहाराबाद -येथील मविप्र संचलित न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज,ताहाराबाद विदयालयातील विद्यार्थी योगेश नामदेव सोनवणे याने हरियाणा मधील मोरणी हिल्स येथे २१ व्या सिनियर, ज्युनियर व सब ज्युनिअर राष्ट्रीय माउंटन बाईक सायकलिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत महाराष्ट्रातर्फे सायकलिग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मार्फत खुल्या गटात वैयक्तिकरित्या भाग घेऊन दुसरा क्रमांक पटकावून कांस्य पदक मिळविले. तसेच योगेशने महाराष्ट्र संघाकडून टीम प्रकारात रौप्य पदक मिळविले. दोन पदकांच्या प्राप्तीमुळे २०२५ मध्ये चीन येथे होणाऱ्या आशियाई खेळासाठी योगेशची निवड झालेली आहे. संपूर्ण नाशिक जिल्ह्यात आशियाई स्पर्धांमधील सायकलिंग मध्ये निवड होणारा योगेश हा पहिलाच विद्यार्थी आहे. अतिशय खडतर आणि गरीब परिस्थितीचा सामना करत योगेशने हे यश प्राप्त केले आहे. त्याच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची कमी नसून फक्त संधीची गरज आहे ही गोष्ट दिसून आली. ग्रामीण भागातील योगेशच्या सायकलिंग मधील यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नक्कीच प्रेरणा मिळेल यात शंका नाही.योगेशच्या या यशाच्या निमित्ताने ताहाराबाद विद्यालयातर्फे प्राचार्य दिपक डावरे, उपमुख्याध्यापिका श्रीमती आर.आर सोनवणे, पर्यवेक्षक श्री बी.एस जगताप,उप- प्राचार्य एस. आर. देशमुख क्रीडा शिक्षक जी. टी.आहेर व विद्यालय परिवारातर्फे योगेशचा सत्कार करण्यात आला.योगेशच्या भावी वाटचालीसाठी मविप्र संस्थेचे सरचिटणीस अँड.नितीनजी ठाकरे, चिटणीस मा.दिलीपजी दळवी, बागलाण तालुका संचालक डॉ.प्रसाददादा सोनवणे, तालुका महिला संचालिका श्रीमती शालनताई सोनवणे , शालेय समिती अध्यक्ष डॉ. प्रशांतदादा सोनवणे व विलासबापू निकम यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. याप्रसंगी जुनियर कॉलेजचे व्ही. डी.जाधव, ए. एम. ठाकरे, डी. डी. चौधरी, एस. जे. गांगुर्डे, एस. आर. कुटे, व्ही. व्ही. विंचुरकर, आर. डी. पैठणे, एस. जी. मोरे, अभिजीत गोसावी,भरतगीर गोसावी, आनंद सैंदाणे,व्ही. एस. निकम, एन. डी. सोनवणे, पी. एस. धोंडगे आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित गोसावी यांनी केले.

## कै पुंडलिक पांडुरंग मवाळ विद्यालयात किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन




**दै. आवाज वृत्तसेवा...**

पिंपरखेड - येथील कै.पुंडलिक पांडूरंग मवाळ विद्यालयात किशोरवयीन मुलींना आज रोजी मासिक पाळी व्यवस्थापन या विषयावर येथील पी. एच. सी. चे डॉ. अमित गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ. जुन्नरे मॅडम यांनी सखोल मार्गदर्शन केले. मुलींच्या विविध प्रश्नांवर त्यांनी चर्चेच्या माध्यमातून समाधानकारक उत्तरे दिली. मुलींच्या समस्यांवर उपाय सुचवले. एकूण ८५ किशोरवयीन मुलींना मार्गदर्शनाचा लाभ मिळाला. यावेळी विद्यालयाच्या वतीने डॉ. जुन्नरे मॅडम यांचा व सहकाऱ्यांचा शॉल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन विद्यालयाच्या उपशिक्षिका श्रीमती अलका शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक काशिनाथ गवळी, जेष्ठ शिक्षक संजय कांदळकर, कैलास पठाडे, लक्ष्मण जाधव, उत्तम सोनवणे, संदीप मवाळ, निलेश चव्हाण, आबा सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या अर्बन क्रूझर हायरायडरमध्ये आता नव्या प्रगत वैशिष्ट्यांची भर

नाशिक-टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज अर्बन क्रूझर हायरायडरमध्ये नव्या वैशिष्ट्यांची भर घातल्याची घोषणा केली असून हे बदल सुरक्षेचा, आरामाचा आणि सोयीसुविधांचा अनुभव नव्याने परिभाषित करत आहेत. या नव्या सुधारणा ग्राहक-केंद्रित नवीन उपक्रमांप्रती असलेली टोयोटाची वचनबद्धता अधोरेखित करतात. ग्राहकांचे मौल्यवान अभिप्राय आणि बदलत्या बाजाराच्या गरजा लक्षात घेऊन, या वैशिष्ट्यांची जोड दिल्यामुळे वाहन चालवण्याचा अनुभव अधिक समृद्ध होत आहे.

# फलादेवाडीत तमाशाने जिंकली प्रेक्षकांची मने

**दै. आवाज वृत्तसेवा...**

संतोष गावडे.आंबेगाव- शिनोली तालुका आंबेगाव येथील श्री साबाजीबुवा यात्रेत सालाबादप्रमाणे गंगापूर बुद्रुक येथील ऋणानुबंध संस्था व भैरवनाथ नाटय मंडळ च्या सुत्रधार अनिल ठोसर व राजु गुंजाळ लेखक दिग्दर्शक असलेले आणि रमेशभाऊ येवले व नित्यानंद येवले निर्मित तमाशा एक रांगडी गंमत वगनाट्य भ्रष्टाचार या संगीतनृत्य व सामाजिक विषयावरील नाटकाचा खेळ सादर झाला, ज्याला शेकडो नाट्यरसिकांची दाद मिळाली,शेवटपर्यंत प्रेक्षकांना खिळवून ठेवत मनोरंजनातुन समाजप्रबोधन साधत नाट्य मंडळाने प्रेक्षकांची मने जिंकली. नाटका च्या कार्यक्रमास प्रमुख ऊपस्थित ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक रामदास काळे, आंतरराष्ट्रीय



स्वाभिमानी मराठा महासंघ पुणे जिल्हाप्रमुख प्राध्यापक अनिल निघोट यांनी शुभेच्छा दिल्या. तर सुत्रधार अनिल ठोसर यांनी प्रस्तावना तर दिग्दर्शक लेखक राजेंद्र गुंजाळ यांनी कलाकार परीचय व महाराष्ट्र राज्य लावणी महासंघ अध्यक्ष संतोष लिंभोरे यांनी बहारदार निवेदनातून नाट्यपरीचय केला. ड्रेपरी ज्ञानेश्वर वाघ,मेकअप अभय शिंदे यांनी केला. नाट्यकलाकार अशोक नरवडे यांनी शिवरायांची महती आपल्या हाडी आवाजात सादर केली तर यांची शिवगर्जना शिवप्रेमींची दाद मिळवुन गेली. तमाशा एक रांगडी गंमत भ्रष्टाचार नाटकाचे कलावंत अर्जुन नरवडे,राजु गुंजाळ, अशोक नरवडे,वसंत येवले,चंद्रकांत ठोसर,रामकृष्ण शेंडे,उल्हास गुंजाळ, दशरथ नरवडे,आकांक्षा नरवडे,गोरक्षनाथ साबळे,अक्षय साबळे,यश फदाले,बाळासाहेब रणदिवे यांनी आपल्या बहारदार अभिनयाने नाट्यरसिकांची वाहवा मिळवली. नृत्यांगना सोनी भोसले, चांदणी देशमुख, स्नेहा वेदिका यांनी आपल्या नृत्याविष्काराने रसिकांना मोहुन टाकले. साबाजीबुवा यात्रा कमेटी व ग्रामस्थांनी ऊत्तम व्यवस्था ठेवली होती.

# लिलाव सूचना

**1. लिलाव जाहिरात (Auction Tender Notice)**

**नांदगाव पोलीस स्टेशन, जिल्हा - नाशिक**

**लिलाव सूचना**

**सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की नांदगाव पोलीस स्टेशन येथे जप्त करण्यात आलेली खालील दोन चाकी वाहने व व इतर स्क्रॅप"as is where is" तत्त्वावर लिलाव करण्यात येत आहेत.**

**लिलावाची तारीख: 11 एप्रिल 2025**

**वेळ व ठिकाण: सकाळी 11:00 वा., नांदगाव पोलीस स्टेशन**

**टेंडर अर्ज अंतिम दिनांक: 10 एप्रिल 2025 पर्यंत**

**टेंडर फी: ₹100/-**

**EMD (अनामत रक्कम): ₹2000/- प्रति वाहन**

**अधिक माहितीसाठी संपर्क: पो.नि. प्रीतम चौधरी, नांदगाव पो.स्टे.**

**नांदगाव पोलीस ठाणे कडील बेवारस** Motorcycle Information

| Sr.No | Motorcycle Name | Motorcycle Number | Chassis Number | Engine Number | विक्री किंमत valuation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dream Yoga | MH21CC8682 | ME4JC589AET024704 | JC58ET3212171 | 4000 |
| 2 | Spelender | MH15CP0587 | MBLHA10EJAHA48432 | HA10EAAHAB2022 | 4000 |
| 3 | Spelender | MH06V4761 | 03F20F13992 | 03F18L12917 | 4000 |
| 4 | Spelender | MH4R4638 | 05M16C38118 | 05M15M32421 | 4000 |
| 5 | Plaser 150 | MH17AR1280 | MD2DHDHZZUCJ64103 | DHGBUJ34512 | 5000 |
| 6 | Platina | MH20Z1819 | MPZDDDZZZRWE63759 | DUMBER78650 | 3000 |
| 7 | Cbz | MH14CZ5480 | MBLKC12EFBGH10466 | KC12EDBGH12113 | 3000 |
| 8 | Honda | No Stunner | ME4JC404C98041890 | JC40E9071407 | 4000 |
| 9 | Spelender | MH15AV1623 | MBLHA10EYAHH03149 | 1A10EFAHH22503 | 4000 |
| 10 | Spelender | MH12HP4130 | MBLHA10AABHH05203 | HA10EGBHH25806 | 3000 |
| 11 | Mat | MH1456431 | 16CBFJ92539 | 16EBF197506 | 1000 |
| 12 | Passion | MH19AR6189 | MBLHA10EG8GC01706 | HA10EB8GC80849 | 3000 |
| 13 | Discover | MH18Y1007 | - | SGBMG39204 | 3000 |
| 14 | Passion | MH05AE2378 | - | 05K08M27182 | 4000 |
| 15 | Plaser | MH15BR81 | MD2DHDHZZNCB57245 | DHGBNB94615 | 4000 |
| 16 | Spelender | MH15AW3291 | 02D20C07783 | 02D18M19691 | 3000 |
| 17 | Spelender | MH19X8036 | 02M20C03460 | 02M19M03343 | 2000 |
| 18 | Tvs | - | MD625MF5XC1L34581 | - | 3000 |
| 19 | Spelender | - | 95K19F01468 | 06G27E08457 | 3000 |
| 20 | Spelender | - | MBLHA10AAMCHG29511 | HA10EJCHG04063 | 3000 |
| 21 | Discover | MH17AS53414 | MDZD5JZZZUWL22563 | JZMBUL66886 | 4000 |
| 22 | Tvs | MH15CL1147 | MD625MF5193H80618 | - | 3000 |
| 23 | Ct100 | MH16W1760 | DUFBLE75311 | DUMBLE62868 | 3000 |
| 24 | Hf Dlx | - | 07010EF12311 | 07522E02541 | 3000 |
| 25 | Spelender | MH41BD7620 | MBLHAR088HHH4158E | HA10AGHHH62641 | 3000 |
| 26 | Spelender | MH15AL4663 | 00F20C14952 | 00F18M14757 | 2000 |
| 27 | Shine | MH18BH2216 | BME4JC58BHGT009927 | JC58ET4315641 | 2000 |
| 28 | Platina | MH19AK5839 | MD2DDDZZZNWF10888 | - | 3000 |
| 29 | Passion | - | 01D21C015 | 01C21M20053 | 2000 |
| 30 | Spelender | - | MBLHA10EJ99D14278 | HALOEA99027046 | 3000 |
| 31 | Cd Dlx | - | 06G29E38702 | 06629F35872 | 3000 |
| 32 | Discover | MH20E55000 | MD2DSPAZZUWG21371 | JBMBUG73860 | 3000 |
| 33 | Hero Dlx | MH154218 | MBLHA11EWD9448738 | - | 3000 |
| 34 | Pulsar 150 | MH19DQ6408 | MD2A11CX1NCF78639 | DHXCLF30404 | 5000 |
| 35 | Tvs Star Ct | MH41AV4674 | MD62FGF18H1H58768 | - | 4000 |
| 36 | Hero Honda Splender | MH15FK6061 | 07K16C00980 | 071C15M19000 | 3000 |
| 37 | Hero Honda Passion | MH15CH5891 | MBLHAI06L99B16390 | HAI0EB99B16042 | 4000 |
| 38 | Boxer | MH17L1553 | BFFBGK13368 | 31MBGK39772 | 2000 |
| 39 | Hero Honda Splender | MH15BF32 | 04D16C35899 | 04015M29647 | 3000 |
| 40 | Hero Honda Splender | MH41K2607 | 06G16F21489 | 06G15E31251 | 3000 |
| 41 | Boxer | MH11OB4759 | F31EA03750 | M31EK031130 | 1000 |
| 42 | Tvs Vector | MH15AV3519 | N3201F027071 | - | 1000 |
| 43 | Hero Honda Ss | MH15AE5480 | - | 99E10E07307 | 2000 |
| 44 | Tvs Vector | MH17P457 | N32HF300060 | - | 2000 |
| 45 | Passion Pro | MH17AD8494 | MBLHA10EWAGC02432 | HA10EDACG39200 | 2000 |
| 46 | Discover | MH19AY6198 | M02DSPAZ7TWE12566 | JBMBPE20349 | 2000 |
| 47 | Discover | MH41AR1669 | D2DSPAZZTWF60157 | JBMBTF54245 | 2000 |
| 48 | Pulser | MH20AP4824 | DHVBLK30056 | DHOBLK28825 | 4000 |
| 49 | Platina | MH41AD1589 | MD2A18AZ7DWD13429 | DZZWDD13386 | 3000 |
| 50 | Discover | MH03AC3642 | - | DSGBLJ63157 | 3000 |
| 51 | - | MH17BG1245 | MBLHA11ALF913974 | HAIIEJF9A33329 | 4000 |
| 52 | Tvs Sport | MH15CZ5224 | MD625MF57AL26273 | - | 4000 |
| 53 | Discover | MH20AW6009 | MD2DSDXZZNAE39311 | DXEBN639378 | 4000 |
| 54 | Pulsar | MH15BZ1110 | MD2DHDJZZNGM83590 | DJGBN12131 | 3000 |
| 55 | Tvs Star Sport | MH15CH9162 | MD625MF5981L86243 | - | 1000 |
| 56 | Hero Honda Cd 100 | MH15BA4290 | - | 01L13E09678 | 4000 |
| 57 | Hero Honda Splender | MH15SR5081 | MBLHA10EYBHG75067 | HA10EFBHG89778 | 2000 |
| 58 | Hero Honda Splender | MH15CW3588 | MBLHA10EZAHG29062 | HA10EFAHG57225 | 3000 |
| 59 | Discover | MH15DF8572 | MD2DSPAZZUWJ25217 | JBMBUJ06050 | 3000 |
| 60 | Cd Dlx | MH15CB3622 | MBLHA11ERC9H11489 | HA11EDC9H13158 | 2000 |
| 61 | Cd Don | MH15BP3539 | 0SK29F31963 | 0SK29E44293 | 2000 |
| 62 | Yamaha | PB11G5860 | 95G1L1532910 | 1L1532910 | 1000 |
| 63 | Hero Honda | MH05E917 | - | G10E582405 | 1000 |
| 64 | - | MH41M8702 | MD2DDJK22ZWH57380 | JMBRH99498 | 1000 |
| 65 | - | - | DDFBEH09852 | DDMBEH09917 | 1000 |
| 66 | Hero Dlx | - | MBLHA11ALE9K14897 | - | 1000 |
| 67 | Platina | MH17AS2931 | MD2DDDZZZVWB12513 | DZMOVB03456 | 1000 |
| 68 | Platina | - | - | DUAMBPG41159 | 2000 |
| 69 | Bajaj Ct 100 | MH03AC7506 | OUFBLL99209 | DOMBLK21650 | 1000 |
| 70 | Hero Passion Pro | - | - | HA10ENDGE35445 | 2000 |
| 71 | Hero Honda Dlx | MH41P9370 | MBLHA11EHA9C00826 | - | 2000 |
| 72 | Discover | MH41N6993 | MD22SJNZZRC667348 | 1N6BR607224 | 2000 |
| 73 | Suzuki | DN09B5188 | M1101F03889 | - | 1000 |
| 74 | 135 Cc Glamour Hero Honda | MH41H4759 | 94L66C00145 | 04L60M00233 | 3000 |
| 75 | Splendar | MH41L6460 | - | 07J115M39256 | 2000 |
| 76 | Hero Honda Splendar | MH15AL5919 | 00G20C039503 | - | 3000 |
| 77 | Ct 100 Red | MH15FD6186 | MD2418ZGF6FWH18636 | BUZWFH89021 | 3000 |
| 78 | Pleasure Black | MH15FH6829 | MD2A13E790CE72354 | DKZCDE68698 | 1000 |
| 79 | Splender Pro Black | MH46MG4067 | MBLHA10A1EHA01369 | HA10EKEHA01222 | 2000 |
| 80 | 4s Bajaj Champion Red | - | F31DH017903 | 31M8FA00283 | 1000 |
| 81 | Discover Black | MH20FS5000 | - | - | 2000 |
| 82 | - | MH43B180 | OFBLC42317 | BUMYC35608 | 2000 |
| 83 | Suzuki | MH124A7793 | 609F699158 | ENG DAMAGE | 1000 |
| 84 | Rajdut – Dhanraj Nathu Chavhan (Talegaon) | - | - | - | 1000 |
| 85 | Tvs Vector | MH18R2732 | N3211F308303 | - | 2000 |
| 86 | Suzuki | MH18D1190 | 770F740907 | - | |
| 87 | No Splender | - | 03J20F07754 | OBJ18E07217 | |
| 88 | - | MH15AL5079 | 07JDBC04898 | 07J1SMO5473 | |
| 89 | Platina Red | - | MD2A18AZXBWA08989 | DZWDA94906 | |
| 90 | Honda Passion | MH15BM7727 | 04M09C50840 | 04M081151535 | |
| 91 | Discover | - | MD2A57AZ4EWA00323 | PAZWFA58011 | |
| 92 | Hero Honda Splender | MH19AL5414 | 07C23F05658 | 07C22E39614 | |
| 93 | Hero Honda Ss | - | - | 03613E01621 | |
| 94 | Honda Shine | MH41Y6678 | 0ME4JC583NC81285080 | JC58E127176 | |
| 95 | Hero Honda Ss | MH20R8903 | - | 78C10E04686 | |
| 96 | Hero Honda Passion | MH15BV4187 | O7H05C13192 | 07H05M10416 | |
| 97 | Pulsar 150 | MH05AE9864 | MD2DHBHZZMCK42628 | DHGBMK79011 | |
| 98 | Tvs Star City | MH20BE5453 | MD625KF5173490381 | - | |
| 99 | Hero Honda Cd Don | MH12AZ7198 | 01D25F04114 | 01D25E01217 | |
| 100 | Splender | MH15AV3585 | 01MH20C07169 | 01H18M02130 | |
| 101 | Splender | MH20CH6833 | MBLHA10EG8G80662 | HL10E6B05192 | |
| 102 | Chesi | - | - | - | |
| 103 | Splender | MH14K5079 | 07A16C15581 | - | |
| 104 | Suzuki | - | 7805F037788 | - | |
| 105 | Hf Dlx | - | 07A23F505L8 | - | |
| 106 | Apachi | - | MD634KE4182N35839 | - | |
| 107 | Passion | MH19DC9662 | - | - | |
| 108 | Discover | MH15CT7121 | - | - | |
| 109 | Vector | MH05X7684 | N3305F518046 | - | |
| 110 | Colibar | - | - | - | |
| 111 | Suzuki | MH19L8134 | F155001 | - | |
| 112 | Bajaj Mat | MH15H7378 | - | - | |
| 113 | Boxer | MH15AF6094 | DFFBFH15737 | FMBF7811 | |
| 114 | Hf Dlx | M15GK2571 | MBLHAR233GH422018 | - | |
| 115 | Unicorn | - | - | - | |
| 116 | Cd Don | MH414082 | - | - | |
| 117 | Cd Dlx | - | MBLHA11AZG6G26183 | HA11EKG9J26337 | |
| 118 | Xcd | MH17Z5793 | MD2DHGBZZRWC23746 | GAMBRB05230 | |
| 119 | Splender | MH15CB3575 | MBLHA10EE89B19716 | AH10ED89B28478 | |
| 120 | Pulsar | - | MD2A11CZ1ECL21028 | DHZCEL99356 | |
| 121 | Splender | - | MBALHAW09KKHH03517 | HA10A67KHH07152 | |

# जिल्हाध्यक्ष पदासाठी स्पर्धा लागणे हे महामंडळाचे यश - प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार

## महाराष्ट्र नाभिक महामंडळ विदर्भ विभागिय बैठक संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव /प्रतिनिधी** – भंडारा महाराष्ट्र नाभिक महामंडळ विदर्भ विभागीय बैठक जे के सभागृह वैशाली नगर भंडारा येथे शनिवार दिनांक५/४/२०२५ रोजी संपन्न झाली. १९८१ साली स्थापन झालेल्या महामंडळाचा उद्देश हा खेड्यापाड्यांमध्ये वाडी वस्तीमध्ये खितपत पडलेल्या आपल्या नाभिक समाजाला प्रतिष्ठा मिळवून देणे हा होता. आजही जिल्हास्तरीय, तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी या गोष्टीवर काम करण्याची गरज आहे. महाराष्ट्राचे शेवटचे टोक असलेल्या या जिल्ह्यामध्ये जिल्हाध्यक्ष आणि तालुकाध्यक्ष पदासाठी स्पर्धा लागते हे खऱ्या अर्थाने चाळीस वर्ष महामंडळाने केलेला कामाचे फलित आहे. एखाद्या संघटनेचा जिल्हाध्यक्ष पद आपल्याकडे यावे म्हणून वाडी वस्ती वरती जाऊन समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी काम करणे हे त्या संघटनेचे खरे यश आहे. आणि आज भंडारा जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या मध्ये महामंडळामध्ये काम करण्यासाठी जी चढाओढ लागलेली आहे ती कै.हणमंतराव साळुंखे तात्या,नाभू संगमवार, शंकरराव जगताप, बिहारचे तात्कालीन मुख्यमंत्री भारतरत्न जननायक कर्पुरी ठाकूर, आदरणीय प्रभाकर फूलबांदे, अंबादास पाटील, पांडूरंग चौधरी, सुमनताई पवार, बाळासाहेब तावरे यांनी अव्याहतपणे ४५ वर्षे केलेल्या कामाची पोचपावती आहे. त्यातून हे सिद्ध होते. सर्वसामान्य नाभिक समाजाचे खूप प्रश्न आहेत.आम्हाला आमच्यातील एका सक्षम राजकीय नेतृत्व तयार होण्याची, शासकीय योजना लोकांपर्यंत पोहोचविण्याची, स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ करण्यासाठी, राजकीय पुढारी आपल्या संवंग लोकप्रियतेसाठी आम्ही ज्या व्यवसायावर जिवापाड प्रेम




करतो,गावगाड्यातील व्यवस्थेने आमच्या वाट्याला दिलेल्या सलुन व्यवसायाची अवहेलना करतात त्यासंबंधी, आमच्यातील हुशार मुलामुलींच्या उच्च शिक्षणासाठी काम करण्याची गरज आहे.अतिशय छोट्या छोट्या गोष्टींसाठी आपण एकमेकांशी वाद करतो,वैरत्व पत्करतो हे बरोबर नाही.आपल्याकडे समाजाच्या उद्धारासाठी देण्यायोग्य जे आहे ते त्यांनी त्यांच्या कुवतीनुसार द्यावे,गरज आहे तिथे समाजाला मदत करावी अशी उपस्थित प्रत्येक नाभिक बंधू भगिनींनी बाळगावी असे आवाहन प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार यांनी यावेळी बोलताना केले. या बैठकीस प्रदेश सरचिटणीस घनश्यामजी वाघ, माजी प्रदेशाध्यक्ष दत्ताजी अनारसे, प्रदेश कोषाध्यक्ष रामदासजी पवार, प्रदेश उपाध्यक्ष मराठवाडा विष्णूजी वखरे, नागपूर विदर्भ विभाग प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र इंगळे,

विदर्भ विभाग अमरावती मंगेश जी माळी, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सुधाकर जी आहेर ,माजी प्रदेश सरचिटणीस दिलीप अनर्थे ,ज्येष्ठ मार्गदर्शक प्रभाकरजी फुलबांधे ,माजी कार्याध्यक्ष अंबादासजी पाटील, नागपूर विभागीय अध्यक्ष डॉक्टर सालोटकर यांच्यासह चंद्रपूर भंडारा नागपूर गडचिरोली वर्धा गोंदिया या जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. समाजाच्या सर्वच प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य करावे तसेच आपली प्रगती सुद्धा ही फार महत्त्वाची आहे हे आपण जागरूकपणे करावी एकमेकांचे हेवे दावे विसरून जावे असे आव्हान त्यांनी केले तसेच यावेळी प्रभाकर फुलबांधे यांनी मार्गदर्शन करताना त्यांच्या अनुभवाचे बोल त्यांनी या ठिकाणी मांडले.यावेळी दत्ताजी अनारसे, रामदास दादा पवार,श्यामभाऊ आस्करकर, विष्णू वखरे,दिलीप अनार्थे यांनी समाजाला संबोधित केले. नागपूर मध्ये कार्य करत असताना ओबीसी च्या आंदोलनामध्ये सुद्धा सहभागी घेतला होता, अनेक मोर्चे आणि निदर्शने तसे या तरुण पिढीने सुद्धा आपल्यावर होणारे अन्याय अत्याचार शासनाविरुद्ध निवेदने देऊन वाचा फोडावी असे आव्हान फूलबांदे यांनी केले .आदरणीय श्री रोशन उरुकूडे यांनी आपल्या कन्येच्या विवाह सोहळ्याचे औचित्य साधून या बैठकीचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व प्रस्ताविक उरुकूडे, मेश्राम, सालोटकर सर केले तर आभार प्रदर्शन अशोक फुलबांधे यांनी मानले.

## बोर्ली पंचतन प्राथमिक आरोग्य केंद्रात जागतिक आरोग्य दिन साजरा, फिरत्या व्हॅनच्या माध्यमातून कर्करोग तपासणी



**दै. आवाज वृत्तसेवा...**

बोर्ली पंचतन । मकरंद जाधव

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सोमवार दि.७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.किशोर कोठुळे यांनी आरोग्यविषयक जनजागृती, आरोग्य तपासणी अशा विषयांवर मार्गदर्शन त्याचबरोबर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवा आणि सुविधांबद्दलही उपस्थितांना माहिती दिली. जागतिक आरोग्य दिनाचं औचित्य साधून प्राथमिक आरोग्य केंद्रात आलेल्या फिरत्या कॅन्सर तपासणी व्हॅनच्या माध्यमातून दंत चिकित्सक डॉ.प्रद्युम्न ठोंबरे यांनी १०७ रुग्णांची तपासणी करुन संशयित मुखकर्क रुग्णांचं योग्य समुपदेशन केलं. स्त्रीरोग तज्ञ उपलब्ध नसल्याने महिलांसाठी असणाऱ्या स्तनाच्या आणि गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची तपासणी होऊ शकली नाही.

या कार्यक्रमात स्थानिक नागरिक, आरोग्य कर्मचारी आशा सेविका, अंगणवाडी सेविका यांचं सहकार्य लाभलं. यावेळी बोर्लीपंचतन ग्रामपंचायतीचे प्रशासक किशोर नागे, ग्रामपंचायत अधिकारी शंकर मयेकर, आरोग्य सेवक संजय हासपाटील व कपिल वसावे, महाराष्ट्र जिवन्नोती अभियान 'उमेद' अंतर्गत महिला ग्रामसंघाच्या पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचं सूत्रसंचालन प्रा.आ.केंद्राचे आरोग्य सहाय्यक घनश्याम कोमटवार यांनी केलं. ग्रामीण भागात कर्करोगाविषयी फारशी जागरूकता नसल्यामुळे शासनाच्या आरोग्य विभागाने फिरत्या व्हॅनच्या माध्यमातून कर्करोग जनजागृती आणि मोफत प्राथमिक तपासणी सुरू केली आहे. या सेवेचा नागरीकांनी लाभ घेऊन आपली तपासणी करण्याचं आवाहन यावेळी करण्यात आलं.

## जय किसान फार्मर्स फोरमच्या कृषी गौरव पुरस्कारांचे उद्या नाशिकमध्ये वितरण

### अन्न मंत्री नरहरी झिरवाळ व कृषी शास्त्रज्ञ डॉ. रमेश ठाकरे यांच्या हस्ते ३८ शेतकऱ्यांचा सपत्निक सन्मान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक – भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतीदिनानिमित्त निमित्त १० एप्रिल ला रावसाहेब थोरात सभागृह, नाशिक येथे स.११.३० वाजता अन्न व प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व आंतरराष्ट्रीय कृषी शास्त्रज्ञ डॉ. रमेश ठाकरे यांच्या हस्ते उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३० शेतकऱ्यांचा सपत्नीक सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला आ. किशोर दराडे, आ. हिरामण खोसकर, मा. जि. प. सदस्य गोरकभाऊ बोडके, डॉक्टर किसानचे डॉ. सुनिल दिंडे, ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ जयराम पूरकर, मुंबई आकाशवाणी चे सहाय्यक संचालक डॉ. संतोष जाधव, इफकोच्या साधनाताई जाधव, सेंद्रिय शेती तज्ञ राजेंद्र गावंडे, बापूसाहेब शिंदे, डॉ. सुभाषराव शिंदे, पांडुरंग चव्हाण आदी प्रमुख उपस्थित राहणार आहे, अशी माहिती फोरमचे अध्यक्ष प्रा.डॉ.संजय जाधव यांनी दिली.

पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांमध्ये शिवाजी डांगळे, भारती निरगुडे, विकास निखाडे, अतिशकुमार वाठोरे, प्रदीप मुळीक, संतोष जाधव, सुवर्णा आवारे, सुनिल शिंदे, सतीश म्हसकर, सुमित धारराव, सुरेश घुगे, श्वेता पवार, मयुर शिंदे, मॉ. जगदंबा शेतकरी गट, रोहिदास पाटील, किरण दुकळे, गीता पवार, दत्तात्रय शेरकर, निलेश बागूल, भरत चौधरी, नितीन शेवाळे, निता गडेकर, गिरीश गावित, सुरेश नाठे, उषा भदाणे, अशोक मार्कंड, मधुरा ढिकले, रघुनाथ महाजन, दिलीप कुंवर, राहूल गाढवे, तुळशीराम देशमुख, अर्चना दिघे, डॉ. ऋषिकेश सोमण, शशिकांत मंगळे, संपत सानप, देविदास गायकवाड, नामदेव देवरे यांचा समावेश आहे. ट्राफी, पैठणी साडी, सन्मानपत्र, शेतकरी गौरव विशेषांक असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

यावेळी सेंद्रिय शेतीवर चर्चासत्र, आमची माती आमची माणसं मासिकाच्या शेतकरी गौरव विशेषांकाचे प्रकाशन होणार आहे. प्रसिद्ध गायिका सुखदा महाजन यांचा सुमधुर गितांचा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून प्रसिद्ध निवेदक व कलावंत तुषार वाघुळदे कार्यक्रमाचे सूत्रसंचलन करणार आहे.

शेतकरी बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन गोपीनाथ लामखडे, गोरक्षनाथ जाधव, भगवान खरे, उत्तम रौंदळ, निवृत्ती न्याहारकर, मयुर गऊल, सविता जाधव, शाम गोसावी, वसंत आहेर, संतोष केदारे, सागर पवार, प्रशांत दिंडे, नाना पाटील, बाळासाहेब मते, गणेश पाटील, संदीप काळे, सुनिल निकम, सागर रहाणे, राजेंद्र धोंडगे, सुयोग जाधव, संकेत लामखडे, शांताराम कमानकर, संदीप उफाडे, सुनिल गमे, हेमंत शिंदे, पुंजाजी मालुंजकर, दीपक खोडे, आदिंनी केले आहे.

## ढोलबारे मार्केटच्या वतीने मोफत पेयजल सेवा



**दै. आवाज वृत्तसेवा...**

तुषार रौंदळ, सटाणा प्रतिनिधी:–

बागलाण तालुक्यातील ढोलबारे येथे चैत्र उत्सवाच्या निमित्ताने मोठ्याप्रमाणात भाविक पायी चालत सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनाला जात असतात. कडकडत्या उन्हात या भाविकांना थंड पाण्याची सोय व्हावी या हेतूने येथिल खाजगी कसमादे शेतकरी कृषी उत्पन्न बाजार ढोलबारे (ता. बागलाण, जि. नाशिक) च्या वतिने मोफत पेयजल सेवा उपलब्ध करुन देण्यात आली. कृषी बाजाराचे सभापती सुरेश (नाना) पवार, सचिव गणेश पवार यांच्या संकल्पनेतून भाविकांना ही सेवा पुरविण्याचे ठरविण्यात आले. उन्हाच्या तडाख्यापासून भाविकांचा बचाव व्हावा, त्यांना विश्रांती घेता यावी यासाठी बाजार समितीच्या प्रवेशद्वाराजवळ भव्य मंडप उभारण्यात आला आहे. पिण्यासाठी थंडगार स्वच्छ पाण्याची सोय करुन भाविकांची सेवा करण्याचे या उत्सवादरम्यान बाजार समितिने नियोजित केले आहे.

ही सेवा चैत्र उत्सव पुर्ण होईपर्यंत ठेवण्यात येणार असून याचा लाभ प्रत्येक भाविकाला घेता येणार आहे. अशी माहिती उपसचिव प्रा. अमोल बच्छाव यांनी दिली. या सेवेच्या उद्घाटनाप्रसंगी बाजार समितीची व्यापारी असोशिएशन, कर्मचारी वृंद, भाविक, शेतकरी बांधव मोठ्याप्रमाणात हजर होते.

## अवस्था ..

धर्मादाय ऋग्णालये
का दयनीय अवस्था
व्याधीग्रस्त स्वता: चं
ढासळूगेली व्यवस्था

किती सोसला संघर्ष
उभाराय छान संस्था
त्रास कळे ज्या त्यास
खाल्ल्या कशाखस्ता

सेवाभाव कठीणव्रत
काट्याकुट्याचारस्ता
टाकूनये घेतला वसा
एकचं सार्थ शिरस्ता

जनकल्याणार्थन्यास
विश्वासअसे विश्वस्ता
कैकदीन वंचितास्तव
जणूं पाठवी फरिस्ता

प्रसन्न धन्वंतरी स्वता
जुळे मानवता रिस्ता
पुनर्जीवन देई प्रयासे
संजीवनी अत्यवस्था

अभय दत्त कृपा छत्र
निर्भय करे भयग्रस्ता
घडले हातून सत्कार्य
अंतरात्म्यासस्वस्थता

**आवाज वृत्तसेवा – हेमंत मुसरीफ, पुणे. मो. ९७३०३०६९९६**